# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, ४th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-४०० ००१ Website:www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२ २२६११०१५


क्र.मराशुवपशिमं/A.I.S.H.E./१५३१६/२०२४ दिनांक- ०५/१०/२०२४

अतितात्काळ / आजच

प्रति,
प्राचार्य / संस्था प्रमुख,
सर्व मान्यता प्राप्त व संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था.

विषय : शै.व. २०२४-२५ करीता ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाची अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) संकेतस्थळावर महाविद्यालयांची ऑनलाईनरीत्या माहिती भरणेबाबत.

संदर्भ : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण यांचा दि. २०.०९.२०२. रोजीचा ई-मेल.

उपरोक्त संदर्भाधिन विषयाच्या अनुषंगाने सर्व संलग्नीत संस्थांच्या प्राचार्य व संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांचे ई-मेल नुसार, सर्वेक्षणाकरीता ज्या नवीन/जुन्या महाविदयालयांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम वेबपोर्टलवर नोंदणी (रजिस्ट्रेशन) केलेली नाही. अशा सर्व संलग्नित महाविद्यालयांनी सन २०२४-२५ करीता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) या वेबपोर्टलवर त्वरीत रजिस्ट्रेशन करुन घेणेबाबत कळविण्यात येत आहे. सन २०२४- २५ करीता रजिस्ट्रेशन/नोंदणीकरीता AISHE वेबपोर्टल सुरु झालेले आहे.

तदअनुषंगाने सर्व सर्व संलग्नीत संस्थांच्या प्राचार्य व संस्थाप्रमुख यांनी सन २०२४-२५ मध्ये ज्या जुन्या/नवीन ए.एन.एम. व जी.एन.एम. महाविद्यालयांनी अद्याप AISHE Code प्राप्त करुन घेतला नाही. अशा महाविद्यालयांचा समावेश सर्वेक्षणांकरीता त्वरीत रजिस्ट्रेशन करुन घेणे अनिवार्य आहे. सर्वेक्षणात माहिती नोंदणीचे डीसीएफ वेबपोर्टलवर अपलोड करणेकरीता सर्व संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. महाविद्यालयांचा समावेश होण्याच्या दृष्टीने वेबपोर्टलवर नोंदणी होणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा याबाबत आपले स्तरावरुन त्वरीत कार्यवाही करुन अहवाल मंडळास सादर करावा..

उच्च शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या मार्फत राष्ट्रीय स्तरावर राबविल्या जाणाऱ्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत, संलग्नित महाविद्यालयांच्या माहिती नोंदणीचे डीसीएफ वेबपोर्टलवर अपलोड करणेबाबतचे काम लवकरच चालू होणार असल्याने तातडीने रजिस्ट्रेशन करुन घ्यावे. संलग्नित महाविद्यालयांचे रजिस्ट्रेशन/नोंदणी AISHE वेबपोर्टलवर न झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानास प्राचार्य व संस्थाप्रमुख जबाबदार राहातील याची नोंद घ्यावी.

प्रबंधक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत,

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.